आचारधर्माचे पालन शिकवणारी ग्रंथमालिका : केशभूषा – खंड ४

# केसांत जटा होण्याची कारणे आणि त्यांवरील उपाय

## अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे '*' या चिन्हाने दर्शवली आहेत.)


१. **डोक्यात जटा होणे** १६

१ अ. जटांची निर्मिती कशी होते ?

१ आ. जटा होण्यामागील शारीरिक, मानसिक अन् आध्यात्मिक कारणे १६

१ इ. जटांमुळे होणारा वाईट शक्तींचा त्रास १६

१ ई. जटा शरिरापासून कापून वेगळ्या केल्या, तरी त्या वाढू शकणे १७

१ उ. उपाय – जटा कापल्यानंतर त्या पाण्यात विसर्जित करणे १७

२. **साधिका सौ. पार्वती केरेमणी यांच्या जटा** १८

* डोक्यात अनेकदा जटा होणे आणि प.पू. डॉक्टरांनी सांगितल्यानंतर कुलदेवीच्या मंदिरात जाऊन कापल्यावर पुन्हा निर्माण न होणे १८

* केसांत जटा होण्याचे कारण, होणारे विविध त्रास आणि त्यांचे जिवावर, तसेच इतरांवर होणारे परिणाम २०

* कारणे २३

* उपाय २५

  * आयुर्वेदानुसार उपाय  * सर्वसाधारण आध्यात्मिक उपाय २५

  * तिरुपतीसारख्या तीर्थक्षेत्री जाऊन जटा-निर्मूलन करणे आणि त्यामागील शास्त्र-विवेचन २८

    * तिरुपती क्षेत्री चांगल्या केसांचे दान करणे, हा एक देहबुद्धी घटवण्याचा हठयोगी प्रयत्न असणे २८

    * तीर्थक्षेत्री केसांच्या जटा काढून टाकल्यास त्यातील काळी

शक्ती अल्प होण्यास साहाय्य मिळणे २९
* जटा-निर्मूलन केल्यानंतर त्यांतील काळी शक्ती नष्ट करण्यासाठी त्या अग्नी-समर्पित करणे किंवा पाण्यात विसर्जन करणे २९
* अग्नितत्त्वाचे उपाय ३०
* जटा या देवीच्या असतात, अशी समाजात दृढ झालेली चुकीची समजूत आणि यामुळे त्या जिवाला होणारा त्रास ३०
३. साधिका सौ. शुभांगी पिंपळे यांच्या जटा ३१
* साधनेच्या विचारांवर वाईट शक्तींनी केलेले आक्रमण आणि बुद्धीवर आलेले काळ्या शक्तीचे आवरण यांचा परिणाम ३१
* भीती वाटून आत्महत्या करण्याचा विचार मनात येणे, त्या वेळी खोलीतील छताच्या पंख्याला गळफास लावल्याचे दृश्य दिसणे आणि श्री भवानीमातेच्या मूर्तीचे दर्शन होऊन तिने त्रासातून बाहेर काढणे ३९
* प.पू. डॉक्टरांच्या सकारात्मक दृष्टीकोनामुळे लढण्यासाठी बळ मिळून मांत्रिकांनी केस कापण्याचा मनात घातलेला विचार नष्ट होणे ४०
* वाढदिवसाच्या दिवशी मांत्रिकाने केलेले तिसरे आक्रमण, तसेच पहिले आणि तिसरे आक्रमण यांमध्ये जाणवलेला भेद ४२
* आक्रमणानंतर केसांची झालेली स्थिती अन् त्यात होत गेलेले पालट ४४
* केसांत वेदना होण्याच्या निमित्ताने देवाने घडवून आणलेले पालट ४५
* प.पू. डॉक्टरांनी सांगितलेल्या उपायांमुळे प्राणशक्ती आणि आत्मविश्वास वाढणे अन् मन सकारात्मक होऊन भीती न्यून होणे ४६
* सप्टेंबर २०११ मधील केसांची स्थिती, त्यामुळे झालेले शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक त्रास अन् साधनेची स्थिती ४७
* जटा सुटण्यासाठी एका संतांनी सांगितलेले उपाय ५१
* प.पू. पांडे महाराज यांनी सांगितलेले उपाय ५२
* प.पू. डॉक्टर यांनी सांगितलेले उपाय आणि त्यांमुळे झालेले पालट ५४
* प.पू. डॉक्टरांनी सांगितलेले उपाय ५६

- ❉ दैवी नादाचे उपाय करणे ५६

❉ प.पू. पांडे महाराजांनी जटा सोडवण्यास सांगणे ५९

- ❉ मांत्रिकाने केलेली वैशिष्ट्यपूर्ण केशरचना ५९
- ❉ जटा काढतांना झालेल्या प्रार्थना आणि सलग ५ दिवस अनुभवलेली स्थिती ५९
- ❉ जटा सोडवतांना केलेले अन्य उपाय ६१

❉ जटा काढल्यावर शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक स्थिती यांत झालेले पालट ६३

❉ उपायांच्या संदर्भात प.पू. डॉक्टरांच्या दृष्टीकोनांत होत गेलेले पालट आणि त्यामागील शास्त्र ७०

# मनोगत

आपण काही स्त्रियांच्या केसांच्या जटा झालेल्या बघतो. बहुतेककरून या स्त्रिया खेडेगावातील असतात आणि आपल्या जटांना त्या 'देवीच्या जटा' म्हणतात. त्यांना असे निदर्शनास येते की, हे जटा झालेले केस जरी कापले, तरी नवीन येणाऱ्या केसांच्या पुन्हा जटा होतात. त्यामुळे त्यांना 'हे काहीतरी दैवी आहे', असे वाटते आणि 'जटा होतात', याचे त्यांना गूढ वाटते. शहरातील एखाद्या स्त्रीच्या डोक्यात जटा झाल्यास ती तिरुपतीला जाते अन् केशवपन करून घेते.

प्रस्तूत ग्रंथात जटा होण्याची काही कारणे दिली आहेत. यांपैकी शारीरिक कारण असेल, तर ते केसांची काळजी (निगा) घेऊन दूर करू शकतो. मानसिक असेल, तर मानसोपचारतज्ञाकडे जाऊन उपचार करून घेऊ शकतो; पण आध्यात्मिक कारण असेल, तर त्यावर उपाय काय, हे बहुतांश लोकांना ठाऊक नसते आणि म्हणूनच त्यांना जटा पुनःपुन्हा निर्माण होत असल्याने गूढ वाटतात. तिरुपतीसारख्या तीर्थस्थानी जाऊन केशवपन केल्याने नेमके काय लाभ होतात, हेही कोणाला ठाऊक नसते. हे सर्वांना समजावे, यासाठी या ग्रंथात जटा होण्याची कारणे, जटा सुटण्यासाठी संतांनी सांगितलेले विविध उपाय आणि ते कसे फलदायी होतात, यांविषयी अध्यात्मशास्त्रीय विवेचन केले आहे.

या ग्रंथात मुख्यत्वे अध्यात्मप्रसार आणि धर्मप्रसार करून समाजामध्ये सत्त्वगुण वाढवण्याची समष्टी साधना करणाऱ्या एका साधिकेच्या केसांच्या जटा कशा झाल्या, तिच्यावरील ते पाताळातील आसुरी शक्तींचे आक्रमण कसे होते, तिच्या केसांच्या प्रत्यक्ष जटा होण्यापूर्वी १-२ वर्षे आधीपासूनच आसुरी शक्ती तिला कशा नियोजनबद्ध त्रास देत होत्या, 'आपल्या केसांच्या जटा होणार', याच्या साधिकेला पूर्वसूचना कशा मिळाल्या, जटा कशा वाढत गेल्या आणि जटा झाल्यानंतर ४ मास (महिने) विविध आध्यात्मिक उपाय केल्यानंतर जटा कशा सुटल्या, यांविषयी अभ्यासपूर्ण विवेचन केले आहे. जटांची छायाचित्रे आणि सूक्ष्म-ज्ञानविषयक चित्रे यांमुळे हा विषय समजून घेणे सोपे होईल.

ग्रंथात केलेल्या विवेचनावरून 'आध्यात्मिक कारणाने जटा कशा होतात', हे समजेल आणि जटांवर दिलेल्या उपायांमुळे अनेकांना त्या समस्येवर मार्गदर्शन मिळू शकेल ! – **संकलक** F (PR 3AKJ)